**संचालक विद्यार्थी कल्याण**

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर**

"सेंट्रल प्राव्हिन्सेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३, दिनांक १ ऑगष्ट १९२३, द्वारा स्थापित व महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ द्वारा संचालित राज्य विद्यापीठ"

क्र.रातुमनावि/सं.वि.क./१५–१६/६५ दि. २५/५/२०१६

## अधिसुचना

राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार आपणास कळविण्यात येत आहे की दिनांक १/१/२०१६ रोजी वयाची १८ वर्षे पुर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना मतदार म्हणून नोंदणी करण्यास प्रोत्साहीत करण्याचे कार्य विद्यापीठ व महाविद्यालयीन स्तरावर करावयाचे आहे. या संबंधी मा. कुलगुरू महोदयांनी गठीत केलेलल्या समिती द्वारे विचार विनीमय करून खालील सुचना व शीफारसी केले आहे.

१) महाविद्यालयांच्या प्रवेश अर्जावर ठळकपणे मतदार म्हणून नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात छापण्यात यावे. फक्त विद्यापीठाद्वारे तयार केलेले आवाहनात्मक मजकूर छापण्यात यावे. विद्यापीठाद्वारे तयार केलेले आवाहनात्मक मजकूर विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२) तसेच विद्यार्थ्यांचे ओळख पत्रावर मतदार नोंदणी बद्दल आणि मतदान करण्याबद्दल आव्हान छापण्यात यावे. फक्त विद्यापीठाद्वारे तयार केलेले आव्हानात्मक मजकुर छापण्यात यावे.

३) मतदार नोंदणीच्या विशेष पुनरिक्षण कार्यक्रमाच्या दरम्यान महाविद्यालयात मतदार नोंदणी अधिकाऱ्यांना केंद्र स्थापन करण्यात यावे.

४) सर्व महाविद्यालयांनी विद्यार्थी कल्याण अधीकारी किंवा रा.से.यो. कार्यक्रम अधीकारी यांना **नोडल अधिकारी नेमून**, नोडल अधिकाऱ्यांचे नाव,हुद्दा व मोबाईल क्रमांक संबंधीत जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर केले जावे. या पत्राची एक प्रत विद्यार्थी कल्याण विभाग,श्रीमंत पूर्णचंद्र बुटी सभागृह, विद्यापीठ ग्रंथालय परिसर, रामदासपेठ, नागपूर या कार्यालयात दिनांक ६ जुन, २०१६ पर्यंत जमा करणे अनिवार्य आहे.

५) विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना त्यांच्याकडून भरून घेण्यात येणाऱ्या प्रवेश अर्जामध्ये त्यांनी मतदार यादीत नाव नोंदविले आहे किंवा नाही याची माहिती घेण्यात यावे. सर्व विद्यार्थ्यांकडून त्यांचे Elector's Photo Identity Card (Voter ID) क्रमांक प्राप्त करून घेण्याची व्यवस्था महाविद्यालयाने करावी. जेणेकरून Database Programme/ Record निर्माण करता येईल.

६) नोडल अधिकारी यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून नमुना कोरे फॉर्म ६,७,८, व ८–अ प्राप्त केले आहे याची खत्री करण्यात यावी.

७) ज्या विद्यार्थ्याकडून फॉर्म ६,७,८, व ८–अ भरून प्राप्त झाले आहेत ते फॉर्म जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर केले असल्याची खात्री करण्यात यावी व तसा अहवाल महाविद्यालयाकडून संचालक, विद्यार्थी कल्याण, श्रीमंत पूर्णचंद्र बुटी सभागृह, विद्यापीठ ग्रंथालय परिसर, रामदासपेठ नागपूर येथे पाठविण्यात यावा.

८) महाविद्यालयांच्या विविध लेखनसामग्रीवर (उदा. ॲडमिशन व इतर फॉर्मस, ब्रोशर्स, प्रवेश पत्रिका, माहिती पुस्तिका, पाठयपुस्तके, नोट बुक, इ.) तसेच संकेत स्थळावर ठळकपणे मतदानासंबंधात आवाहन करणारा मजकूर छापण्यात येईल. फक्त विद्यापीठाद्वारे तयार केलेल मजकुर उपयोगात आणावे.जर छपाईचे काम झालेले आहे तर स्टीकर तयार करून चिटकविण्यात यावे.